जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट क्रमांक - ६९३ दिनांक - १५/०९/२०२३

### खंडणी विरोधी पथक-०२,गुन्हे शाखा,पुणे शहर

### कुख्यात गुन्हेगार बाबुलाल लक्ष्मण मोहोळ व त्याचे साथीदार यांनी खंडणीसाठी अपहरण करुन डांबून ठेवलेल्या दोन वृध्द महिला यांची सुखरूपणे सुटका करुन खंडणीखोर आरोपींना केले जेरबंद

खंडणी विरोधी पथक-०२ कडील पोलीस अधिकारी व अंमलदार हे गुन्हे प्रतिबंध अनुषंगाने पेट्रोलिंग करीत असताना पोलीस अंमलदार,शंकर संपते यांना दि.१४/०९/२०२३ रोजी माहिती मिळाली की,कुख्यात गुंड गुन्हेगार बाबुलाल लक्ष्मण मोहोळ व त्याचे साथीदार यांनी फिर्यादी यांची आई व त्यांच्या सहकारी महिला या दोघींचे दिनांक १३/०९/२०२३ रोजी सांयकाळी अपहरण करुन डांबून ठेवून मारहाण करीत आहे व त्यांचे सुटकेसाठी १७ लाख रुपयांची मागणी करीत आहेत.

सदरची माहिती मिळताच पोलीस उप-आयुक्त,गुन्हे व सहा.पो.आयुक्त,गुन्हे-०२ यांनी खंडणी विरोधी पथक-०२ चे अधिकारी व अंमलदार यांना सदरचा अपहरण करणारा आरोपी व त्याचे साथीदार हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याने,तात्काळ टिम तयार करुन कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. त्यानुसार खंडणी विरोधी पथक-०२ चे पोलीस निरीक्षक,श्री.प्रताप मानकर, पोउनि.श्रीकांत चव्हाण व अंमलदार यांनी जलद गतीने पथक तयार करुन,सदर अपहृत महिला व आरोपी यांची ठिकाण्याबाबतची माहिती मिळवून आरोपींवर कारवाई करुन उत्तमनगर पुणे येथून सराईत गुन्हेगार **१)बाबुलाल लक्ष्मण मोहोळ,वय ४५ वर्षेरा.सरडेबाग,पार्वती अपार्टमेंट समोर,उत्तमनगर,पुणे २)अमर नंदकुमार मोहिते,वय ३९ वर्षे,रा.गणेशनगर,एरंडवणा,ओटा वसाहत, पुणे ३)प्रदिप प्रभाकर नलवडे,वय ३८ वर्षे,राजगुरु अपार्टमेंट,भुगाव,पुणे ४)अक्षय मारुती फड,वय २४ वर्षे,रा. अमर भारत सोसायटी,वारजे माळवाडी,पुणे** यांना जेरबंद करुन,त्यांचे ताब्यातील नमूद अपहृत महिलांची सुखरुप सुटका केली.

सदर अपहृत महिला यांचेकडे चौकशी करता आरोपींनी नमूद महिलांना दि.१३/०९/२०२३ रोजी सायंकाळी ७/०० वा. रुद्र हॉटेल उत्तमनगर पुणे येथे बोलावून पुणे स्टेशन येथील स्टॉल मिळवून दिले नाहित म्हणुन ६ लाख रुपयांचा तोटा झाला आहे असे म्हणून दमदाटी करुन मारहाण करुन तेथून अपहरण करुन उत्तमनगर येथील एका खोलीमध्ये डांबून ठेवून रात्रभर शिवीगाळ व मारहाण करून,नमूद महिलेचा मुलगा (फिर्यादी) यास फोनवरुन त्यांच्या सुटकेसाठी १७ लाख रुपयांची मागणी करीत असल्याचे निष्पण्ण झाले.

सदर आरोपी यांचेवर **उत्तमनगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.९६/२०२३,भा.दं.वि.कलम ३८५,३८७, ३६४(अ),३४१,३२३,५०४,५०६,३४** नुसार गुन्हा दाखल करुन,नमूद चार आरोपींना पुढील कार्यवाहीकामी उत्तमनगर पोलीस स्टेशनचे ताब्यात दिले आहे. सदर गुन्हयातील मुख्य आरोपी बाबुलाल लक्ष्मण मोहोळ याचेवर यापूर्वी जीव घेण्याचा प्रयत्न,दरोडा,दरोडयाची तयारी,दंगल,अग्निशस्त्रे बाळगणे असे १० गुन्हे व इतर आरोपींवर सुध्दा शरीराविरुध्दचे गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार, मा.सह पोलीस आयुक्त,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त,(गुन्हे),श्री.अमोल झेंडे, मा. सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-२,श्री.सतिश गोवेकर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथक-०२,गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक,श्री.प्रताप मानकर, पोलीस उपनिरीक्षक,श्रीकांत चव्हाण, मोहनदास जाधव व पोलीस अंमलदार विजय गुरव, प्रदिप शितोळे, विनोद साळुंके, संग्राम शिनगारे, सुरेंद्र जगदाळे, शंकर संपते, सैदोबा भोजराव, सचिन अहिवळे, चेतन आपटे, इश्वर आधंळे, राहुल उत्तरकर, पवन भोसले, चेतन शिरोळकर, प्रदिप गाडे, किशोर बर्गे, आशा कोळेकर यांनी केलेली आहे.